# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 16 June 2024

## Time: 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १६ जून २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- चित्रपट क्षेत्राच्या वाढीसाठी केंद्र सरकार वचनबद्ध–मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनात सोहळा केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांची ग्वाही
- ** व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना प्रदान
- साहित्य अकादमीच्या बाल साहित्य पुरस्कारासाठी भारत सासणे यांची तर युवा पुरस्कारासाठी तुळजापूर इथले साहित्यक देविदास सौदागर यांची निवड
- बोगस अथवा चढ्या दरानं बियाणे विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई– कृषिमंत्र्यांचा इशारा
  आणि
- उन्हाळी सुट्यांनंतर शाळांमध्ये पुन्हा बालकांचा किलबिलाट

चित्रपट क्षेत्राच्या वाढीसाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही, केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी दिली आहे. `मिफ` अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन डॉ मुरुगन यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. भारताला आशय निर्मितीचं जगातलं केंद्र म्हणून उभं करण्याचं सरकारचं धोरण असून, माहितीपट, लघुपट, तसंच ॲनिमेशन निर्मात्यांनी भारतात यावं, भारतात चित्रीकरण करावं असं आवाहन त्यांनी केलं. या महोत्सवात काल प्रतिष्ठेचा व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार विख्यात वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना प्रदान करण्यात आला. राज्यमंत्री मुरुगन, राज्याचे

सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, ज्येष्ठ निर्माते किरण शांताराम, अभिनेता रणदीप हुडा आदी मान्यवरांच्या हस्ते सुब्बय्या यांना हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. महोत्सवाच्या उद्घाटन सत्रात `बिली अँड मॉली: ॲन ऑटर लव्ह स्टोरी हा चित्रपट दाखवण्यात आला. यंदा प्रथमच या महोत्सवात मुंबईसह पुणे, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नई इथं ५९ हून अधिक देशातल्या ६१ भाषांमधल्या ३१४ चित्रपटांचं चित्रपटांचं प्रदर्शन केलं जात आहे.

****

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे'चे जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ कलावंत रोहिणी हट्टंगडी आणि अशोक सराफ यांना काल परिषदेचे विश्वस्त शरद पवार यांच्या हस्ते काल मुंबईत प्रदान करण्यात आला. नाटयसंमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, नाट्य परिषदेचे विश्वस्त उदय सामंत, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

साहित्य अकादमीचे २०२४ या वर्षासाठीचे बाल साहित्य पुरस्कार तसंच युवा पुरस्कार काल जाहीर झाले. मराठीत भारत सासणे यांच्या `समशेर आणि भूत बंगला` या कादंबरीला बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. तर युवा पुरस्कारात तुळजापूर इथले साहित्यक देविदास सौदागर लिखित `उसवण` या कादंबरीची निवड करण्यात आली आहे. पन्नास हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असं दोन्ही पुरस्काराचं स्वरूप आहे.

दरम्यान, सौदागर यांनी, उसवण कादंबरीच्या माध्यमातून कष्टकरी कुटुंबाचं जगणं मांडलं आहे. ग्रामीण भागातल्या वास्तवाची पुरस्काराच्या रुपाने दखल घेतल्याचा आनंद असल्याची प्रतिक्रिया सौदागर यांनी आकाशवाणीशी बोलतांना दिली...

"पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद वाटत आहे आणि एकूण राष्ट्रपती झाल्यासारख वाटत आहे आजवर जे लिखाण केलं जे काय आपलं लग्न मांडलं त्याची नोंद घेतली असं वाटत आहे पुरस्कार देणार आहे आपलं एकूण जगण्याचे लग्नाची नोंद घेतली असे वाटते"

****

विद्यार्थ्यांनी उच्चशिक्षण संस्थांमध्ये घेतलेला प्रवेश तीस सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास किंवा अन्य संस्थेत प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्काचा परतावा देणं संबंधित संस्थेला बंधनकारक राहणार आहे. सरकारी उच्चशिक्षणसंस्था, आयोगानं मान्यता दिलेल्या संस्था, तसंच अभिमत विद्यापीठं या सगळ्यांना हे धोरण लागू होणार आहे.

****

आगामी विधानसभा निवडणुका एकत्रितपणे लढवत, प्रत्येक जागेवर सक्षम उमेदवार देणार असल्याचं महाविकास आघाडीकडून सांगण्यात आलं आहे. काल मुंबईत पत्रकार परिषद घेऊन लोकसभा निवडणूक निकालाचं विश्लेषण तसंच विधानसभा निवडणुकीबाबत माहिती देण्यात आली. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

राज्यात बी- बियाणांची चढ्या भावानं विक्री किंवा बोगस बियाण्यांची विक्री करणाऱ्या कृषी निविष्ठा दुकानदारांवर कठोर कारवाईचा इशारा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला आहे. राज्यातले सर्व विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, कृषी अधिकारी यांची आढावा बैठक मुंडे यांनी काल घेतली, त्यावेळी ते बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यात अतिरिक्त तीन भरारी पथकं नेमावीत तसंच या भरारी पथकांनी दररोज कमीत कमी २५ दुकानांवर धडक भेटी देऊन तपासण्या कराव्यात, कोणताही गैरप्रकार आढळल्यास जागच्या जागीच गुन्हा दाखल करून परवाना निलंबनाची कारवाई करावी, असे निर्देश मुंडे यांनी दिले आहेत. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी जून अखेर पर्यंत पीक कर्जाचं उद्दिष्ट ७५ टक्के मर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना मुंडे यांनी दिल्या.

****

उन्हाळी सुट्टीनंतर राज्य शिक्षण मंडळाच्या शाळा काल पुन्हा एकदा मुलांच्या किलबिलाटाने भरून गेल्या. छत्रपती संभाजीनगर तालुक्यात गाडीवाट इथं आदर्श प्राथमिक शाळेत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थित शाळा प्रवेशोत्सव सोहळा पार पडला. इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सजावट केलेल्या वाहनातून मिरवणूक काढण्यात आली. महापालिकेच्या मराठी तसंच उर्दू अशा एकूण ५६ शाळांमध्येही काल प्रवेशोत्सव साजरा झाला. महापालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचं वाजत गाजत मिरवणूक काढून स्वागत करण्यात आलं.

****

परभणी शहरातल्या अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच गुलाबाची फुलं देऊन स्वागत करण्यात आलं.

हिंगोली जिल्ह्यातही पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचं पुष्प देऊन अनेक शाळांमध्ये स्वागत करण्यात आलं, तसंच विद्यार्थ्यांना पुस्तकांचं वाटपही करण्यात आलं.

****

जालना शहरासह जिल्ह्यात ग्रामीण भागातल्या शाळांमध्ये पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत पाठ्यपुस्तकांचं वाटप करण्यात आलं. विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजनात मिष्टान्नाचं वाटप करण्यात आलं.

****

लातूर जिल्ह्यात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून ‘शाळेतील पहिलं पाऊल, वृक्ष लावून’ हा उपक्रम राबवण्यात आला. जिल्ह्यातील शाळांमध्ये काल जवळपास १६ हजार विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतला, त्यांच्या हातून वृक्षारोपण करण्यात आल्याचं, प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.

****

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश दिले जाणार होते. मात्र शाळा सुरू झाल्या, तरीही अनेक विद्यार्थी गणवेशापासून वंचित असल्याची टीका, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं माध्यमांशी बोलत होते.

दरम्यान, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटांकडून शालेय गणवेश शिऊन घेण्याच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली असल्याचं, राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे. राज्यातल्या अनेक शाळांमधून गणवेश वाटपाला प्रारंभ झाला असल्याचं, तटकरे यांनी सांगितलं.

****

मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात सरकार अनुकूल असल्याचं, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी म्हटलं आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांची रुग्णालयात भेट घेतल्यानंतर ते बोलत होते. नवनिर्वाचित खासदार संदिपान भुमरे, आमदार संजय शिरसाट यावेळी उपस्थित होते.

****

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल भारत-कॅनडा संघांदरम्यानचा सामना पावसामुळे रद्द झाला.आणि उभय संघांना प्रत्येकी एक गुण प्रदान करण्यात आला. कालच्या दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने नामिबियाचा डकवर्थ लुईस नियमाच्या आधारे ४१ धावांनी पराभव केला. स्कॉटलंड आणि ऑस्ट्रेलिया संघात सध्या सामना सुरू आहे. स्कॉटलंडच्या दोन बाद १०७ धावा झाल्या आहेत.

****

लातूर जिल्ह्याच्या हेर विधानसभा मतदारसंघाचे दोन वेळचे आमदार टी.पी.कांबळे यांचं काल हृदयविकारानं निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. भारतीय जनता पक्षातर्फे आणि अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव हेर मतदारसंघातून ते निवडून आले होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज लक्कड जवळगा इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

महेश नवमी काल साजरी करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथं वाद्यांच्या गजरात सजीव देखाव्यांची मिरवणूक काढण्यात आली. जिल्हा माहेश्वरी सभेतर्फे हर घर पौधा निसर्गसंवर्धन उपक्रमाचा प्रारंभ या निमित्तानं करण्यात आला.

बीड शहरातूनही मिरवणूक काढण्यात आली, आबालवृद्धांचा यात लक्षणीय सहभाग होता.

हिंगोली इथं महेश नवमी आणि जागतिक रक्तदान दिनाच्या अनुषंगाने माहेश्वरी युवा संघटनेच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आलं. या शिबिरात १११ तरुणांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केलं.

****

तुळजापूर इथं तुळजाभवानी मंदिर प्रशासकीय कार्यालयासमोर हिंदुत्वनिष्ठ आणि समविचारी संघटनांनी आज घंटानाद आंदोलन केलं. तुळजाभवानी मंदिरातील गैरव्यवहार प्रकरणी गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत, मात्र महिनाभराचा कालावधी उलटूनही याबाबत काहीही कारवाई न झाल्यानं हे आंदोलन केल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल 'श्री शिवराज्याभिषेक – नव्या युगाचा प्रारंभ' या केदार फाळके लिखित पुस्तकाचं प्रकाशन झालं. छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतीय समाजाचे स्वत्व रक्षण करून हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली असं प्रतिपादन फाळके यांनी यावेळी बोलतांना केलं.

****

नांदेड जिल्हा परिषद गट–क संवर्गातील आरोग्य परिचारिका आणि कंत्राटी ग्रामसेवक या संवर्गातील रिक्त पदं भरण्यासाठी आजपासून पाच दिवस तीन सत्रात ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्र परिसरात जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

****

मराठवाड्यात आज आणि उद्या वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. नांदेड वगळता, विभागात सर्व जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

****